म्हाडा
MHADA
# उपमुख्य अधिकारी / पणन विभाग,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई
कक्ष क्र.२४० पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा) कलानगर वांद्रे (पूर्व) मुंबई-५१

*जाहिर सुचना*

जा.क्र.उपमुअ/पणन/मुं.मं./कार्या.१५/ ४९४८ /२०२१
दिनांक- २५/११/२०२१

**विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाद्वारे काढण्यात आलेल्या सोडतीमधील माहे. जाने-२०२० ते माहे. जून-२०२१ च्या कालावधीमध्ये सदनिकेची रक्कम भरणा करण्याकरीता तात्पुरते देकारपत्र देण्यात आलेल्या लाभार्थींना सदनिकेची विलंब शुल्कासह रक्कम भरण्यास मुदतवाढीबाबत.**

**संदर्भ -१. या कार्यालयाचे परिपत्र क्र. १३९ दि. ०८.०१.२०२१**
**२. या कार्यालयाची जाहीर सूचना क्र. २८३५ दि. १५.०७.२०२१**

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ [म्हाडाचा विभागीय घटक] द्वारे विविध वसाहतीमधील योजनांच्या वाटपासाठी सोडत काढण्यात आली आहे. सद्यास्थिती कोविड-१९ महामारीच्या प्रादुर्भावामुळे व मुंबई महानगर पालीकेने कोविड-१९ विलगीकरणासाठी मंडळाच्या काही सदनिका ताब्यात घेतल्यामुळे लाभार्थींना सदनिकेची रक्कम भरण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले होते.

तरी ज्या लाभार्थींना जानेवारी-२०२० ते जून २०२१ पर्यंत तात्पुरते देकारपत्र देण्यात आलेल्यांना यापुर्वी जाहीर सूचनेद्वारे विलंब शुल्काची आकारणी करण्याच्या अधिन राहून दि. १८.१०.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, त्यांना मा.उपाध्यक्ष / प्राधिकरण यांच्या अधिकारामध्ये वाढीव मुदतीच्या तरतुदीनुसार यापुढे ९० दिवस म्हणजेच दिनांक १६.०१.२०२२ पर्यंत प्रचलित व्याज दरासह आकारणी करुन सदनिकेची विक्री किंमतीचा भरणा करण्याकरीता अंतिमत: मुदतवाढ देण्यात येत आहे.

**(मा.उपाध्यक्ष / प्राधिकरण यांचे मान्यतेने)**

**(राजेंद्र गायकवाड)**
उप मुख्य अधिकारी / पणन
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई

**प्रत,**
सर्व गट लिपीक, विभाग-पणन, मुंबई मंडळ यांनी उपरोक्त प्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

**प्रती,**
१. मुख्य लेखाधिकारी, मुंबई मंडळ यांना माहीतीस्तव.
२. सहाय्यक लेखाधिकारी/जमा/ मुंबई मंडळ यांना माहीतस्त.
३. ॲक्सीस बॅंक, बांद्रा यांना माहीतीस्तव तसेच याअनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.